# जनसंपर्क अधिकारी


**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४२२-२०२४** **दिनांक- ११/११/२०२४**

## "अंमली पदार्थाची तस्करी करणा-या दोघां विरोधात गुन्हे शाखा कक्ष-३ च्या कारवाईत १३.५०० किलोग्रॅम वजनाचा गांजा जप्त"

----///----

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या आहेत.

त्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पेट्रोलिंग दरम्यान दिनांक ०९/११/२०२४ रोजी १६.३० वाजता जि. पालघर. ता. वसई, वसई पुर्व, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील गुजरात वाहीणीवरील शिवाचा पाडा जवळील बंद अवस्थेत असलेला सायली पेट्रोलपंप जवळ बलेनो कार क्रमांक एम.एच. ०१ डी.ई. ६६५१ मधुन आरोपीत नामे - १) संतोष रामजीत जैसवार वय - २६ वर्षे, रा. रुम नंबर ५०३, बिल्डींग नंबर १४ ए विंग, लल्लु भाई कंम्पाऊन्ड, मानखुर्द पश्चिम, मुंबई. २) विकास धनंजय झिंजुर्टे वय - २२ वर्षे रा. रुम नंबर ५, शिवाजी छत्रपती चाळ, साठेनगर, मानखुर्द पश्चिम, मुंबई यांचे कब्जातुन उग्रवासाचा काळपट रंगाचा कॅनबीस या वनस्पतीचे शेंडे म्हणजेच गांजा नावाचा अंमली पदार्थ एकुण वजन १३.५०० किलोग्राम वजनाचा एकुण ८,७२,७६०/- रु किंमतीचा मुद्देमाल तस्करी करीत असतांना मिळुन आले आहेत.

सदर आरोपीत विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८३३/२०२४ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २२ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पेल्हार पोलीस ठाणे करीता आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा.

पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोउपनिरी/ ज्ञानेश्वर आव्हाड, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुनिल पाटील, अतिष पवार, मनोहर तारडे, तुषार दळवी, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.



----ooo----